**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ६.०० )**

**गुरुवार  दिनांक ६ नोव्हेंबर  २०२५**

**ठळक बातम्या**

1. **वंदे मातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाचं उद्या दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उदघाट्न**
2. **नुकसान भरपाई न मिळालेल्या अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम लवकरच जमा होणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं आश्वासन**
3. **नागपूर जिल्हयातील काटोल-नरखेड विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीत फेरफार झाल्याचा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचा आरोप**
4. **भारत - ऑस्ट्रेलिया दरम्यानच्या चौथ्या टी -ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचा ४८ धावांनी विजय**

---------------------------------------------------

**वंदे मातरम शतकोत्तर सुवर्णमहोत्सव**

वंदे मातरम या राष्ट्रीय गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवानिमित्त देशात वर्षभर साजऱ्या होणाऱ्या स्मृतीदिनाचं उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्या दिल्लीमध्ये होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं याचं आयोजन करण्यात येणार असून, स्वातंत्र्य चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आणि राष्ट्रीय अभिमान, एकता जागृत करणाऱ्या या कालातीत गीताची दीडशेवी वर्षपूर्ती साजरी होणार आहे. सात नोव्हेंबर २०२५ ते सात नोव्हेंबर २०२६ दरम्यान हा उत्सव साजरा केला जाणार आहे. या निमित्तानं स्मरण तिकीट आणि नाण्याचं प्रकाशनही पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात येईल.

---------------------------------------------------

**‘वंदे मातरम’**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ‘वंदे मातरम्’ गीताच्या १५० व्या वर्धापन दिनानिमित्त उद्या सकाळी १०:३० वाजता सामूहिक गायन होणार आहे. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनात होणाऱ्या या कार्यक्रमास कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे आणि कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित राहणार आहेत. अमरावतीच्या संत गाडगे बाबा विद्यापीठात देखील मुख्य प्रशासकीय इमारतीजवळील ध्वजस्तंभाजवळ कुलगुरूंच्या उपस्थितीत सामूहिक गायनाचं आयोजन करण्यात आलं आहे.

---

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

राज्यातल्या काही अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांपर्यंत अद्यापही नुकसान भरपाईची मदत पोहोचली नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे, मात्र ही मदत येत्या काळात शेतकर्यांच्या खात्यात जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. आज नागपूर इथं पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले,

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस -२४ सेकंद)***

***सरकारचं पॅकेज हे लोकांच्या खात्यांमध्ये पोचताहेत. हे खरे की काही ठिकाणी अजून पॅकेज पोचलेल नाही. त्यामुळे तिथल्या शेतकर्यांमध्ये काही संभ्रम आहे , कि पोहचणार आहे की नाही. पण जसं आम्ही सांगितलं रोज जवळपास 600 कोटी रुपये हे आरबीआयच्या नियमानुसार त्या ठिकाणी आम्हाला द्यावे लागतात आणि त्याचं रिकॉन्सिलेशन कराव लागत. म्हणूनच पॅकेजला वेळ लागतो आहे. आता जवळपास हे संपूर्ण पॅकेज,येत्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या खात्यांमध्ये जाईल.***

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या मराठवाडा दौऱ्यासंबंधी बोलताना फडणवीस यांनी, निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन हा दौरा असल्याची टीका केली.दरम्यान पुण्यातील कथित जमीन घोटाळा प्रकरणी झालेल्या आरोपांच्या संदर्भात कुठेही अनियमितता झालेली असेल, तर त्यावर निश्चितच कारवाई केली जाईल असं फडणवीस म्हणाले

---

**सपकाळ +वड्डेटीवार**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार यांच्या कंपनीने पुण्यातील कोरेगाव पार्क येथील तब्बल ४० एकर वतन जमीन भ्रष्ट मार्गाने बळकावल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. हजारो कोटींची जमीन केवळ ३०० कोटी रुपयांत विकत घेऊन फक्त ५०० रुपयांची स्टॅम्प ड्युटी भरल्याचं त्यांनी सांगितलं. हा व्यवहार तत्काळ रद्द करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी सपकाळ यांनी केली. तर नागपुरात पत्रकारांशी बोलताना विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका करत सरकारी मालकीची जमीन आणि २१ कोटींची स्टॅम्प ड्युटी माफी एवढ्या वेगाने कशी मंजूर झाली? असा सवाल उपस्थित केला.

---

**अनिल देशमुख**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे ज्येष्ठ नेते आणि माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी काटोल-नरखेड विधानसभा मतदारसंघातील मतदार यादीत तब्बल ३५ हजार ५३५ मतांची फेरफार झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. भाजपने निवडणूक आयोगावर

प्रभाव टाकून मतदार यादीत अनियमितता केल्याचा आरोप त्यांनी पत्रकार परिषदेत केला. यावेळी त्यांनी नागपूर जिल्ह्यातील कोंढाळी मधील गैरप्रकाराचा उल्लेख केला

***(होल्ड बाईट - अनिल देशमुख - २६ सेकंद)***

***एक कोंढाळीचे भारतीय जनता पार्टीचे नेते आहेत याच नाव आता कोंढाळीतं येईल नगर पंचायतचं आरक्षण का येईल याबद्दल त्यांनी कोंढाळी मध्ये सुद्धा नावं ठेवलं आणि आपल्याला जे आरक्षण पाहिजे ते कोंढाळीमध्ये आलं नाही तर ग्रामीणमध्ये सुद्धा आपलं नावं राहील पाहिजे म्हणून ग्रामीणमधे सुद्धा जिल्हा परिषदेत निवडणुकीसाठी त्यांनी आपलं नाव ठेवलं .अशा पद्धतीने अनेक ठिकाणी डबल मतदान त्या हितानं आहेत विधानसभेत याचा फार मोठ्या प्रमाणात अश्या पद्धतीनं मत चोरी झाली अशा प्रकारची संपूर्ण परिस्थिती आहे.***

दरम्यान, शेतकरी, व्यापारी, कर्मचारी आणि सामान्य नागरिकांमध्ये भाजपविरोधात तीव्र नाराजी असून, येत्या निवडणुकांपूर्वी पराभव टाळण्यासाठी भाजप अशा कारवाया करत असल्याचा आरोप देशमुख यांनी केला.

---------------------------------------------------

**बिहार निवडणूक**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातलं मतदान आज होत आहे. संध्याकाळी ५ वाजे पर्यंत ६०.१३ टक्के मतदानाची नोंद झाली. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पाटणा जिल्ह्यातल्या बख्तियारपूर इथं मतदानाचा हक्क बजावला तर उपमुख्यमंत्री आणि तारापूर मतदारसंघातले भाजप उमेदवार सम्राट चौधरी यांनी मुंगेर इथं, भाजप नेते आणि केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय यांनी हाजीपूर इथं मतदान केलं. या टप्प्यात १८ जिल्ह्यातल्या १२१ विधानसभा मतदारसंघांचा समावेश असून, एक हजार ३१४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

---------------------------------------------------

**आर्थिक सहाय्य**

मार्च २०२५ मधील दहावीच्या परीक्षेत गुणवत्ताप्राप्त झालेल्या नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमधील ५० विद्यार्थ्यांना मनपातर्फे दरवर्षी दोन टप्प्यांमध्ये ५० हजार रुपयांचं आर्थिक सहाय्य दिलं जाणार आहे. मनपा शाळांतील गुणवंत विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. मनपा शाळांचा यावर्षीचा निकाल ९०.२८ टक्के इतका लागला असून, पहिल्या क्रमांकाच्या विद्यार्थ्याला ९४ टक्के गुण मिळाले आहेत. याशिवाय मुलींच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी दरवर्षी ४ हजार रुपयांचा उपस्थिती भत्ता देण्यात येतो. डिजिटल

बोर्ड, सायन्स लॅब, संगणक प्रशिक्षण आणि समुपदेशन उपक्रमांमुळे मनपा शाळांची गुणवत्ता सातत्यानं वाढताना दिसत आहे.

---

**मध्य रेल्वे**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ऑक्टोबर मध्ये उल्लेखनीय मालवाहतूक कामगिरी नोंदवली आहे. विभागानं 859 रेक लोड करून ₹332.76 कोटींचं उत्पन्न मिळवलं कोळसा, लोखंड धातू, क्लिंकर, डोलोमाइट आणि आयरन स्लॅग वाहतुकीत लक्षणीय वाढ झाली आहे. कार्यक्षम संचालन, ग्राहकसेवा आणि वाहतूक विविधीकरणावर लक्ष केंद्रित केल्यामुळे ही कामगिरी शक्य झाल्याच विभागान सांगितलं .

---

**गंगा महाआरती**

गोंदिया जिल्ह्यात महाराष्ट्र-मध्यप्रदेश सीमेवरील बाघ नदी इथल्या कोरणी घाटावर श्री विठ्ठल रुक्मिणी ट्रस्टतर्फे वाराणसीप्रमाणेच काल गंगा महाआरती आयोजित करण्यात आली. 21 शे दिव्यांच्या प्रकाशात झालेल्या या आरतीत दोन्ही राज्यांतील हजारो भाविकांनी सहभाग घेतला

---

**भारत - ऑस्ट्रेलिया टी - ट्वेंटी**

भारत - ऑस्ट्रेलिया दरम्यान पाच टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतील चौथ्या सामन्यात आज भारताचा ४८ धावांनी विजय झाला. ऑस्ट्रेलियात कॅररा इथं झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारताने आठ गडी गमावून ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी १६८ धावांचं लक्ष्य ठेवलं. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा संपूर्ण संघ केवळ ११९ धावा करून बाद झाला. भारत आता या मालिकेत २-१ न पुढं आहे. शनिवारी ब्रिस्बेन इथं होणारा अंतिम सामना ऑस्ट्रेलियासाठी निर्णायक ठरेल.

---

**बुद्धीबळ**

बुद्धिबळामध्ये फिडे विश्वचषक स्पर्धेत, ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश, अर्जून एरिगेसी आणि पेंटला हरिकृष्णा यांनी स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला आहे. दीप्तायन घोषने जागतिक विजेता इयान नेपोमनियाला पराभूत करत आश्चर्याचा धक्का दिला.

---

**जात प्रमाणपत्र**

गडचिरोली जिल्ह्यातील सर्वसाधारण रहिवासी असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील १२वी आणि त्यापुढील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विद्यार्थी https://etribevalidity.trti-maha.in/ या पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करून संबंधित प्रस्ताव प्रत्यक्ष अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, जिल्हा परिषद वसाहत, कॉम्प्लेक्स एरिया, गडचिरोली येथे सादर करावा, असे सहआयुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, गडचिरोली यांनी कळविले आहे

---------------------------------------------------